माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : १३४९/२०२०**

**अपिलार्थी, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,**
**रा. रा.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ.**
**विरुध्द**
**उत्तरार्थी १. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,**
लेखा विभाग, नगर परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.
**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.
सुनावणी दिनांक १३.०८.२०२६ (In Continuation of order dated १०.०२.२०२६)

द्वितीय अपील सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. हरिश जाधव, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयेश लोखंडे व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रोशन चव्हाण उपस्थित आहेत.

**विवेचन**

आयोगाने कलम १९ (१०) नूसार पारित केलेले आदेश कलम १९ (७) नूसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणास अनुपालनासाठी बंधनकारक आहे. मात्र आयोगाने दि. दि. ०४.०९.२०२५ व १०.०२.२०२६ रोजी आदेशीत करुन सुध्दा अपिलकर्त्यास अद्याप माहिती पुरविली नाही. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून आयोग याबाबत तिव्र नाराजी व्यक्त करित आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

**अंतरिम आदेश**

१. मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ यांना प्रस्तुत प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (क) पोटकलम (२) नूसार जन माहिती अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, आयोगाने दि.०४.०९.२०२५ व १०.०२.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशातील अनु.क्र. १ नूसार अपिलकर्ता यांना अपिलकर्ता यांना आज पासून ३ दिवसाच्या आत माहिती पुरवावी व तसा अहवाल पुढील सुनावणीचे वेळी आयोगास सादर करण्यात यावा. या आदेशाची पुर्तता विहीत मुदतीत /कालमर्यादेत न केल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जयेश लोखंडे यांचेविरुध्द माहितीचा अधिकर अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार अधिकतम शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये, याबाबतचा खुलासा सादर करण्याचे निर्देश दि. १०.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आले होते. मात्र श्री. लोखंडे यांनी त्यांचा कोणताही खुलासा आयोगास सादर केला नाही. म्हणुन त्यांचेविरुध्द दि. १०.०२.२०२६ च्या आदेशान्वये कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये प्रस्तावित असलेली शास्ती कायम करण्यात येत असून त्यांना दर दिवशी रु.२५०/- प्रमाणे ८३



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

दिवसाकरिता रु. २०,७५०/- (अक्षरी रुपये विस हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती करण्यात येत आहे.

३. आंहरण व संवितरण अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यवतमाळ यांनी जन माहिती अधिकारी श्री. जयेश लोखंडे यांचे वेतनातून उपरोक्त शास्तीची रक्कम एकसमान दोन टप्प्यात वसूल करुन ती रक्कम माहिती अधिकार अधिनियमाचे लेखाशिर्ष ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) मध्ये जमा करावी. तसेच वसूल केलेल्या चलानची प्रत अनुपालन म्हणुन आयोगास प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावी.

४. प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक २१.०८.२०२६ रोजी घेण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ
सत्यमेव जयते
अमरावती विभाग

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १३.०८.२०२६**
जावक क्रमांक ६३०७ दिनांक 19 AUG 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती